कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३

# ट्रॅक्स वरील कंपन नियंत्रणासाठी एमएमआरसीद्वारे स्विस मशीनचा वापर

मुंबई, नोव्हेंबर ११, २०२० - कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ ने मुंबईकरांचा भुयारी प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी एमएमआरसी ने स्विस कंपनी मे. सोनविले-निर्मित मशीन च्या सहायाने हाय व्हायब्रेशन अटेन्युएशन बुटेड ट्वीन स्लीपर ब्लॉक्सची निर्मिती प्रायोगिक तत्वावर सुरू केली आहे. ही ट्रॅक यंत्रणा अद्ययावत असून स्लीपर बॉक्स ची निर्मिती वडाळा येथे शुरू आहे .अशा प्रकारचे आणखी एक मशीन लवकरच उपलब्ध होणार आहे.

अशा प्रकारचे ट्रॅक्स भारतात प्रथमच वापरण्यात येत आहेत. सर्व साधारण मेट्रो ट्रॅक्स ची २२ व्हीडीबी इतकी कंपन शोषण क्षमता असते. मात्र, स्लीपर बॉक्समुळे ट्रॅक्स ची कंपन शोषण क्षमता अधिक कमी होणार आहे. मुंबई शहरासाठी ही सक्षम यंत्रणा अतिशय योग्य आहे कारण इथे संवेदनशील इमारती, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, चित्रीकरण स्टुडिओ इत्यादि आहेत. तसंच पुरातन इमारती आणि दाटीवाटीची वस्ती आहे.

संपूर्ण प्रकल्पाला २ लाख १ हजार आणि सहाशे इतके स्लीपर ब्लॉक्स लागणार असून अशा प्रकारची २ मशीन्स महिन्याला १२ हजार स्लीपर ब्लॉक्सची निर्मिती करतील.

" कंपनांची परिणामकारकता कमी करण्यासाठी आणि प्रवाशांच्या आरामदायी प्रवासासाठी ही पद्धत सर्वोत्तम आहे. आवश्यकते प्रमाणे योग्य वेळेत स्लीपर बॉक्सची निर्मिती करण्यासाठी ही एकूण प्रक्रिया मे. सोनविले यांच्या स्विस तज्ज्ञांच्या देखरेखी खाली पार पडत आहे." असं एमएमआरसी चे [प्रकल्प] संचालक श्री. एस के गुप्ता म्हणाले. [समाप्त]

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com